F-286

शासन ज्ञापन, क्रमांक-एलसीएस-२६०७/५५२/प्र.क्र. १२६/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ३१/०९/०८

जिल्हाधिकारी मुंबई
... यांचे कार्यालय
1 SEP 2008
18601
111 F

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मौजे कोलेकल्याण, ता. अंधेरी, नभूक्र ४४५७ अ व ४४५८, क्षेत्र १२०० चौ. मी. जागा विनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेस अंतिमतः प्रदान करणे बाबत..

पहा :- शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग क्रमांक-एलसीएस-२६०७/५५२/प्र.क्र. १२६/ज-३, दिनांक २२ एप्रिल, २००८

शासन ज्ञापन :-

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे पत्र क्रमांक- मशा/कार्या-२/जमीन-३/ कावि-४३८/२००८, दिनांक १०/१२/२००८ व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक-१६/३ एफ/एफ-२८६, दिनांक २१/११/२००८ ला अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्यात येते की, मौजे कोलेकल्याण, ता. अंधेरी, नभूक्र ४४५७ अ व ४४५८ मधील पार्कींग लॉट, सिव्हील डिफेन्स, रेखांकन रस्ता, १३.४० मी. रुंद विकास योजना रस्ता इत्यादी सार्वजनिक आरक्षणांनी बाधीत जमिनीचे क्षेत्र वगळून वाटपास उपलब्ध होणारे सुमारे १२०० चौ. मी. क्षेत्र विनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेस प्रदान करणे बाबत संस्थेस दिनांक २२/४/२००८ च्या पत्रान्वये हेतूपत्र देण्यात आले आहे. आता सदरचे क्षेत्र विनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेस सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेल्या २० सभासदांच्या उत्पन्न गटानुसार अनुज्ञेय चटईक्षेत्राप्रमाणे निवासाची व्यवस्था करण्याकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- एलसीएस-०६०६/प्र.क्र. ५४/ज-१, दिनांक २५/५/२००७ व शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक जमीन-१०/२००३/प्र.क्र. ४०१/ज-१, दिनांक २५/७/२००७ च्या धोरणात्मक आदेशातील व शासनाने याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशातील अटी/शर्तीनुसार प्रस्तावित जमिनीची शिघ्रसिध्दगणकानुसार होणा-या चालू बाजारभावाच्या किंमतीच्या दराप्रमाणे सभासदांच्या उत्पन्न गटनिहाय सवलतीची किंमत संस्थेकडून वसूल करून पुढे नमुद केलेल्या अतिरिक्त अटीवर तसेच नेहमीच्या अटी/शर्तीवर व जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/शर्तीवर जमीन अंतिमतः मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अटी :- १) सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेल्या सभासदांनी त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतरच त्यांच्या सभासदत्वास मान्यता देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी. तसेच अ. क्र. १९ ते २० येथील सभासदांनी त्यांची पात्रतेबाबतची कागदपत्रे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सादर करावीत. जिल्हाधिकारी यांनी सभासदांची पात्रता शासन निर्णय दिनांक २५/५/२००७ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार तपासून त्यांच्या सभासदत्वासंदर्भात पुढील निर्णय घ्यावा. तसेच संस्था २०% मागासवर्गीय सभासदांची अट व ३% अंध/अपंग सभासद घेण्याची अट पूर्ण करीत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर संस्थेस जमिनीचा ताबा देण्याची कार्यवाही करावी.

२) सदर जमीन अर्जदार संस्थेस नियंत्रीत सत्ताप्रकार भोगवटादार वर्ग-२ म्हणून प्रदान करण्यात यावी. (4)

३) सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन वितरणा संदर्भातील शासन निर्णय दिनांक २५/५/२००७ व दिनांक २५/७/२००७ मधील तरतुदी संस्थेवर बंधनकारक असतील.

५) सदर जागेचा मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

६) संस्थेने सदर जागेचा विकास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील तरतुदीनुसार व त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या मंजूर नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीनुसार करणे संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेशिवाय कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

७) यासंदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर हे ठरवितील त्या अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

२. सदरचे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( जे. पी. डांगे )
अपर मुख्य सचिव (महसूल)
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.
५) महालेखापाल, १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६) महालेखपाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
७) नगर विकास विभाग, नवि-११, मंत्रालय, मुंबई
८) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव, विनायक सहकारी गृहनिर्माण संस्था, व्दारा, भारतदर्शन सोसायटी, ब. नं. ७/४९९, एम. एच. बी. कॉलनी, टाटा पॉवर हाऊस, बोरीवली (पूर्व), मुंबई-५१
१०) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन ज्ञापन, क्रमांक एलसीएस-२६०७/५५२/प्र.क्र. १२६/ज-३, दिनांक

सोबतचे परिशिष्ट "अ"

| अ.क्र. | सभासदाचे नांव | शासकीय कर्मचारी/ खाजगी व्यवसाय | प्रवर्ग | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | |
| १ | श्री. राजेंद्र शंकर भोसले | खाजगी नोकरी | खुला | सक्षम प्राधिका-याचा उत्पन्नाचा दाखला सादर करण्याच्या अटीवर पात्र |
| २ | श्री. किरण शंकर बाईत | खाजगी नोकरी | खुला | पात्र |
| ३ | श्री. अमित अशोक केसरकर | खाजगी नोकरी | खुला | पात्र |
| ४ | श्री. प्रकाश छगन चव्हाण | खाजगी नोकरी | मागासवर्गीय | पात्र |
| ५ | श्री. दिनेश रमेश मीरचंदानी | खाजगी नोकरी | खुला | पात्र |
| ६ | श्री. कुलदीप दिनकर खानविलकर | खाजगी नोकरी | खुला | पात्र |
| ७ | श्री. दिनकर लक्ष्मण पाटील | खाजगी नोकरी | खुला | सक्षम प्राधिका-याचा उत्पन्नाचा दाखला सादर करण्याच्या अटीवर पात्र |
| ८ | श्री. विजय ज्ञानदेव चोरटे | खाजगी नोकरी | खुला | पात्र |
| ९ | श्री. सुगम रमेश भोगले | खाजगी नोकरी | खुला | पात्र |
| १० | श्री. बाबासाहेब अनंत रेडकर | शासकीय कर्मचारी | खुला | पात्र |
| ११ | श्री. अमोल अभिमान यादव | शासकीय कर्मचारी | खुला | पात्र |
| १२ | श्री. अजित प्रल्हाद देशमुख | शासकीय कर्मचारी | खुला | पात्र |
| १३ | श्री. कुणाल श्रीराम तुरकमाने | खाजगी नोकरी | मागासवर्गीय | स्वतःच्या निवासाबाबत शपथपत्र सादर करण्याच्या अटीवर पात्र |
| १४ | श्री. संदिप धर्मा जाधव | खाजगी नोकरी | मागासवर्गीय | दोन अपत्यांच्या अटीचे हमीपत्र देण्याच्या अटीवर पात्र |
| १५ | श्री. दिपक रविकांत कपूर | खाजगी नोकरी | खुला | सक्षम प्राधिका-याचा उत्पन्नाचा दाखला सादर करण्याच्या अटीवर पात्र |
| १६ | श्री. गिरीश प्रविण ओझा | खाजगी नोकरी | खुला | सक्षम प्राधिका-याचा उत्पन्नाचा दाखला सादर करण्याच्या अटीवर पात्र |

②

87

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | श्री. तुषार जसवंत पंचाल | खाजगी नोकरी | खुला | सक्षम प्राधिका-याचा उत्पन्नाचा दाखला सादर करण्याच्या अटीवर पात्र |
| १८ | श्री. संपत रतन डावखर | शासकीय कर्मचारी | खुला | पात्र |
| १९ | श्रीमती कथिता स. देसाई | ----- | खुला | सदर सभासदांनी त्यांची पात्रतेबाबतची कागदपत्रे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सादर करावीत. जिल्हाधिकारी यांनी सभासदांची पात्रता शासन निर्णय दिनांक २५/५/२००७ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार तपासून त्यांच्या सभासदत्वा संदर्भात पुढील निर्णय घ्यावा. |
| २० | श्री. चंद्रसेन बा. सावंत | --- | खुला | |

( जे. पी. डांगे )
अपर मुख्य सचिव (महसूल)
महसूल व वन विभाग.

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

**प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१**

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 E mail :- Mumbai Suburban Collector@maharashtra gov in

क्र. :- १६/३अ/एफ-२८६
दिनांक :- १४/०९/२०१०

**वाचले :** १) शासन, महसूल व वन विभागाचे ज्ञापन क्र.एलसीएस-२६०७/५५२/प्र.क्र.१२६/ज-३ दि.३१/८/०९.
२) या कार्यालयाचे पत्र समक्रमांक दि.१०/९/०९.
३) संस्थेचे पत्र दि.२६/८/२०१०.

**आदेश :**

मौजे कोलेकल्याण, ता. अंधेरी न.भु.क्र.४४५७अ व ४४५८ मधील पार्कींग लॉट, सिव्हील डिफेन्स, रेखांकन रस्ता, १३.४० मी. रुंद विकास योजना रस्ता इ. बाधीत जमीनीचे क्षेत्र वगळुन वाटपास उपलब्ध होणारे सुमारे १२०० चौ.मी. जमीन संस्थेच्या २० सभासदांच्या उत्पन्न गटानुसार अनुज्ञेय चटई क्षेत्राप्रमाणे निवासावी व्यवस्था करण्यासाठी शासन, महसुल व वन विभागाकडील निर्णय क्र.एलसीएस-१६०६/प्र.क्र.५४/ज-१ दि.२५/५/०७ व क्र.जमीन-१०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१ दि.२५/७/०७ च्या धोरणात्मक आदेशातील व शासनाने याबाबत वेळोवेळी निर्गमीत केलेल्या अटी / शर्तीनुसार निघ्रसिध्दगणकानुसार चालु बाजार भावाप्रमाणे सभासदांच्या उत्पन्न गटनिहाय सवलतीची कब्जेहक्काची किंमत वसूल करुन मंजुर करण्यास मान्यता दिली आहे.

या कार्यालयाचे उपरोक्त दि.१०/९/०९ चे पत्रानुसार खालीलप्रमाणे पुर्तता करणेबाबत संस्थेस कळविणेत आले होते.

१) प्रस्तावीत सभासदांच्या उत्पन्न गटाप्रमाणे सवलतीची कब्जेहक्काची किंमत रु.७२,००,०००/- भरणा करावी.

२) शासन ज्ञापन दि.३१/८/०९ सोबतचे परीशिष्ट अ मध्ये नमुद केलेप्रमाणे ११ पात्र सभासदांखेरीज उर्वरीत सभासदांच्या नावासमोर दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता करावी.

३) एकुण सभासद संस्थेच्या २०% सभासद मागासवर्गीय व ३% सभासद अंध / अपंग आवश्यक असल्यामुळे एका मागासवर्गीय व एका अंध / अपंग व्यक्तीचा सभासदत्वासाठी प्रस्ताव सादर करावा.

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत पात्र सभासदांच्या संस्थेची नोंदणी करुन कार्यकारी समिती व पदाधिकारी यांची निवड करावी व नोंदणी प्रमाणपत्रासह ठरावाच्या प्रती सादर कराव्यात.

५) सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन वितरणासंदर्भात शासन निर्णय दि.२५/५/०७ व २५/७/०७ मधील तरतुदी संस्थेवर बंधनकारक राहील, अशा आशयाचा करारनामा करणेसाठी दोन प्रतीष्ठीत नागरीकांसह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित रहावे.

संस्थेने त्यांचे उपरोक्त पत्रानुसार खालीलप्रमाणे पुर्तता केली आहे.

१) जमीनीची सवलतीची कब्जेहक्काची किंमत रु.७२,००,०००/- डिमांड ड्राफ्ट नं.६२६७१ दि.२५/८/१० महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक, मुंबई अन्वये दि.२६/८/१० रोजी भरणा केली आहे.

२) शासन ज्ञापन दि.३१/८/०९ सोबतचे परीशिष्ट अ मधील निर्देशाप्रमाणे श्री संदीप धर्मा जाधव यांचे हमीपत्र सादर केले आहे.

३) संस्थेने कोणताही नवीन सभासदाचा प्रस्ताव सादर केला नाही.

४) संस्थेने नोंदणी प्रमाणपत्र व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या निकडीबाबत ठरावाची प्रत सादर केली आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता, संस्थेचे एकुण-१२ सदस्य मान्यतेस पात्र ठरतात. पैकी २ सभासद मागासवर्गीय आहेत. त्यामुळे शासनाचे प्रचलित धोरणाप्रमाणे २०% प्रमाण राखण्यात येत आहे. सदस्य संस्था कमी असल्यामुळे अंध / अपंग सदस्यांचा प्रश्न उपस्थित होत नाही.

त्याअर्थी मौजे कोलेकल्याण, ता. अंधेरी येथील न.भु.क्र.४४५७अ व ४४५८ मधील आरक्षणाने बाधीत होणारे क्षेत्र वगळुन वाटपासाठी उपलब्ध होणारे सुमारे १२०० चौ.मी. क्षेत्र संस्थेस संस्थेच्या सभासदांच्या उत्पन्न गटानुसार अनुज्ञेय होणाऱ्या चटई क्षेत्राप्रमाणे निवासाची व्यवस्था करण्यासाठी शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र.एलसीएस-१६०६/प्रं.क्र.५४/ज-१ दि.२५/५/०७ व क्र.जमीन-१०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१ दि.२५/७/०७ मधील अटी / शर्तीसह खालील अतिरिक्त अटीवर प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच परिशीष्टामध्ये नमुद केलेप्रमाणे सभासदांना मान्यता देणेत येत आहे.

**अटी :**

१) शासन ज्ञापन दि.३१/८/०९ सोबतचे परिशिष्ट अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उर्वरीत सदस्यांबाबत त्रुटींची पुर्तता करावी.

२) संस्थेतील मागासवर्गीय सदस्यांचे प्रमाण २०% व अंध / अपंग सदस्यांचे प्रमाण ३% राखण्याबाबत आवश्यक प्रस्ताव सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३) जमीन प्रदानाच्या अटी / शर्ती मान्य असलेबाबत करारनामा करण्यासाठी बोलावण्यात येईल, तेव्हा दोन प्रतीष्ठीत नागरीकांसह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी हजर राहणे, बंधनकारक राहील.

खरी प्रतीवर जिल्हाधिकारी

(सही)
~~स्वाक्षरित~~ जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
सचिव,
विनायक सह.गृह.संस्था (म.)
सि.स.नं.४४५७अ, ४४५८,
कोलेकल्याण, सांताक्रुझ (पु),
मुंबई-४०० ०५५.

प्रत :

१) तहसिलदार अंधेरी / नगर भूमापन अधिकारी, बांद्रे
२/- जागेचा ताबा संस्थेस देवून ताबेपावती व सुधारीत अभिलेखासह पुर्तता अहवाल सादर करावा.

२) उपनिबंधक, सहकारी संस्था, (एच/पूर्व) विभाग, बांद्रा (प), मुंबई-४०० ०५१ यांच्याकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(सही)
~~स्वाक्षरित~~ जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा



Received
15/09/10
Issued
Three
0914

565

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील आदेश क्र.१६/३अ/एफ-२८६ दि.१४/०९/२०१० सोबतचे

## परिशिष्ट

| सभासद क्रमांक | सभासदाचे नांव व प्रवर्ग | उत्पन्न गट |
|---|---|---|
| १) | श्री किरण शंकर बाईत (खुला) | खाजगी<br>रु. १४,४६०/- |
| २) | श्री अमित अशोक केसरकर (खुला) | खाजगी<br>रु. ११,०००/- |
| ३) | श्री प्रकाश छगन चव्हाण (मा.व.) | खाजगी<br>रु. १४,५८३/- |
| ४) | श्री दिनेश रमेश मीरचंदानी (खुला) | खाजगी<br>रु. १४,०००/- |
| ५) | श्री कुलदीप दिनकर खनविलकर (खुला) | खाजगी |
| ६) | श्री विजय ज्ञानदेव चोरटे (खुला) | खाजगी<br>रु. १३,५००/- |
| ७) | श्री सुगम रमेश भोगले (खुला) | खाजगी<br>रु. १८,५८३/- |
| ८) | श्री बाबासाहेब अनंत रेडकर (खुला) | शासकीय वर्ग-२ |
| ९) | श्री अमोल अभिमान यादव (खुला)<br>श्रीमती स्वप्ना अमोल यादव - पत्नी | शासकीय वर्ग-१ |
| १०) | श्री अजित प्रल्हाद देशमुख (खुला)<br>श्रीमती राजकुवर अजित देखमुख - पत्नी | शासकीय वर्ग-१ |
| ११) | श्री सपंत रतन डावखरे (खुला) | शासकीय वर्ग-१ |
| १२) | श्री संदीप भर्मा जाभव (मा.व.) | खाजगी<br>रु. १७,०८३/- |

[illegible] मतीचर जिल्हाधिकारी
[illegible]

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा